**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २७ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात.**
2. **राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीचं वाटप ५० टक्क्यावरून ७० टक्क्यापर्यंत वाढवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय.**
3. **२०११ पर्यंतची सरकारी जमिनीवरील निवासी अतिक्रमणं नियमीत केली जाणार.**
4. **नागपूरच्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्रात 27 मार्च ते 5 एप्रिल दरम्यान "ऑरेंज सिटी क्राफ्ट मेळ्याचं" आयोजन.**

उत्पादन शुल्क

पश्चिम आशियातल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर, देशांतर्गत वापरासाठीच्या पेट्रोल आणि डिझेलवरील केंद्रीय उत्पादन शुल्कात प्रत्येकी दहा रुपये प्रति लिटरने कपात करण्यात आली आहे. यामुळे वाढत्या किमतींपासून ग्राहकांना संरक्षण मिळेल. याव्यतिरिक्त, डिझेलच्या निर्यातीवर साडे २१ रुपये प्रति लिटर आणि विमान इंधनावर साडे २९ रुपये प्रति लिटर दराने शुल्क आकारण्यात आलं आहे. यामुळे देशांतर्गत वापरासाठी या उत्पादनांची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित होईल, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. त्या म्हणाल्या -

जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये प्रचंड वाढ होत असताना, अनेक देशांनी हा बोजा आपल्या नागरिकांवर टाकला. भारताने मात्र आपल्या गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचं रक्षण करण्याचा निर्णय घेतल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

एलपीजी पुरवठा

व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी पुरवठ्यात आणखी २० टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. यासंदर्भात पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ.निरज मित्तल यांनी राज्य सरकारांना पत्र लिहिलं आहे. यामुळे आता हॉटेल, उपाहारगृह यासारख्या व्यावसायिकांना ७० टक्के एलपीजी पुरवठा होणार आहे.

मुख्यमंत्र्यांशी संवाद

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सरकार करत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी,पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार आहेत.दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून होणाऱ्या या बैठकीत पंतप्रधान, राज्यांची तयारी आणि उपाययोजनांची माहिती घेणार आहेत. टीम इंडिया या भावनेनं सर्व राज्यांमध्ये समन्वय साधणं, हा या बैठकीचा उद्देश आहे. ज्या राज्यांमध्ये

निवडणुकांमुळे आचारसंहिता लागू आहे, त्या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीत सहभागी होणार नसल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

लॉकडाउनची अफवा

देशात लॉकडाउनच्या अफवेवर जनतेन विश्वास ठेवू नये. असा कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नसल्याचं, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी स्पष्ट केलं आहे. जागतिक परिस्थितीत सातत्याने बदल होत असून, आपात्कालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी सरकार पूर्णपणे सज्ज असल्याची ग्वाही, त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात दिली. भारत सगळ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज असल्याचं सांगत पुरी यांनी नागरिकांना शांत, जबाबदार आणि एकत्र राहण्याचं आवाहन केलं आहे.

चंद्रशेखर बावनकुळे

शेतरस्ते अडवणारे शेतकरी आता सरकारी योजनांसाठी अपात्र ठरतील, अशी तरतूद राज्य सरकारनं केली असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. ते आज नागपुरात माध्यमांशी बोलत होते. शेत आणि पांदण रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांचे आधार कार्ड आणि फार्मर आयडी पाच वर्षांसाठी ब्लॉक करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित व्यक्ती शासनाच्या विविध योजना आणि मदतीसाठी अपात्र ठरतील. मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आपण हा निर्णय घेतल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

आदिती तटकरे

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना फेब्रुवारी महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात आल्याची माहिती महिला बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. येत्या २-३ दिवसांत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात हा सन्मान निधी जमा होणार आहे.

व्हायरल व्हिडीओ

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणातील व्हिडीओ, फोटो तसेच एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने मॉर्फिंग केलेली सामग्री समाज मध्यावर प्रसारित करणाऱ्या ६५ खात्यांवर सायबर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. फेसबुक, इंस्टाग्राम आणि एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील या सर्व ६५ अज्ञात व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहितेतील, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अतिक्रमण नियमित

महाराष्ट्रातल्या गरीब आणि गरजू कुटुंबांना घरं देण्यासाठी राज्य सरकारनं महत्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार, बृहन्मुंबई वगळता एक जानेवारी २०११ पर्यंत झालेली आणि सध्या अस्तित्वात असलेली सरकारी जमिनीवरील निवासी अतिक्रमणं नियमीत केली जाणार आहेत. यासाठी पात्रता आणि अंमलबजावणीची कार्यपद्धती ठरली असून, ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. याबाबत महसूल विभागाचा शासन निर्णय जारी झाला आहे.

ऑरेंज सिटी क्राफ्ट मेला

नागपूरच्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या वतीनं आयोजित बत्तीसावा "ऑरेंज सिटी क्राफ्ट मेला आणि लोकनृत्य महोत्सव" यंदा 27 मार्च ते 5 एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचं उद्घाटन आज सायंकाळी 6.30 वाजता होणार आहे. दररोज दुपारी 2 ते रात्री 9.30 वाजेपर्यंत हस्तशिल्प मेळ्यास नागरिकांना प्रवेश दिला जाईल, तर मुख्य मंचावर सायंकाळी 6.30 पासून लोकनृत्यांचे सादरीकरण होईल. या महोत्सवात देशभरातील सुमारे 150 हून अधिक हस्त शिल्पकार आणि 300 पेक्षा अधिक आदिवासी कलाकार सहभागी होणार आहेत. विविध राज्यांतील लोकनृत्य, आदिवासी कला, तसेच पारंपरिक खाद्यपदार्थांचे स्टॉल हे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, गोवा, मध्य प्रदेश, मणिपूर आदी राज्यांतील नृत्यप्रकार सादर केले जाणार आहेत. 31 मार्च रोजी दिव्यांग मुलांचे विशेष सादरीकरण तर प्रसिद्ध गायिका प्रियंका अहिरवार यांचं लोकसंगीत सादर होईल. 1 एप्रिल रोजी कबीर गायन आणि ट्रान्सजेंडर कलाकारांकडून महाराष्ट्रातील लोकनृत्य सादर होणार आहे.

जहाज दाखल

इराण युद्ध आणि होर्मुज सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे अनेक दिवस अडकून पडलेले भारतीय ध्वजधारी 'जग वसंत' हे जहाज अखेर भारतात पोहोचल आहे. हे जहाज आज सकाळी गुजरातमधील बंदरावर दाखल झाल. गेल्या काही दिवसांत भारतीय ध्वजधारी 'पाइन गॅस' आणि 'जग वसंत' या दोन जहाजांनी होर्मुज सामुद्रधुनी पार केली होती. 'जग वसंत' आणि 'पाइन गॅस' या जहाजांवर एकूण 92 हजार 612 मेट्रिक टन एलपीजी गॅस भरलेला आहे. 'जग वसंत' जहाजावर 33 भारतीय नाविक, तर 'पाइन गॅस' वर 27 भारतीय नाविक कार्यरत आहेत.

पश्चिम आशिया संघर्ष

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी दिलेली मुदत 6 एप्रिलपर्यंत वाढवली असून तोपर्यंत इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करणार नाही, असं सांगितलं आहे. दरम्यान अमेरिकी सैन्याच्या आणखी हजार तुकड्या

इराणच्या जवळ पोहोचल्या आहेत. तर इराणचा पाठिंबा असलेल्या हिज्बुलच्या विरोधात लढण्यासाठी इस्त्रायलनं दक्षिण लेबेनॉनमध्ये आणखी तुकड्या पाठवल्या आहेत. दरम्यान इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवरची पकड आणखी घट्ट केली असून इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा मारा सुरूच ठेवला आहे. इराणमधे राजधानी तेहरानसह इतर शहरांवरही मोठ्या प्रमाणात हल्ले झाल्याचं वृत्त आहे.

कृषी हवामान केंद्रं

हवामानावर आधारित कृषीविषयक सेवा अधिक सक्षम करण्यासाठी भारतीय हवामानशास्त्र विभागातर्फे महाराष्ट्रात ११ नवीन स्वयंचलित कृषी हवामान केंद्रं उभारण्यात येणार आहे. मिशन मौसम च्या दुसऱ्या टप्प्यांत ही हवामान केंद्र उभारली जाणार आहेत. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या व्यापक उपक्रमाचा हा एक भाग असून, २०२६ च्या अखेरीपर्यंत अशा प्रकारची २०० केंद्रं देशात उभारण्याचं उद्दिष्ट आहे. या नव्या केंद्रांमुळे कृषी हवामानविषयक निरीक्षणं अधिक सक्षम होतील आणि शेतकऱ्यांना हवामानाधारित अचूक सल्ला देणे शक्य होणार आहे.

हवामान

नागपुरात आज कमाल तापमान ३९ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. पूर्व विदर्भातील भंडारा जिल्हा वगळता आज नागपूरसह, वर्धा, गडचिरोली, गोंदिया या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दरम्यान विजांचा कडकडाट आणि ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वारा राहू शकतो. ही परिस्थिती पुढील दोन दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे आणि त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत असं आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. दरम्यान, अकोल्यात वाढत्या तापमानामुळे चारचाकी वाहनांना आग लागण्याच्या घटना समोर येत आहेत. वाढते तापमान लक्षात घेता वाहनांमध्ये इंधन जास्त न भरण्याचे आणि खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

*****